# इतिहास आपल्या ‘रुपया’चा!



शैलेन भांडारे

विशेष लेख







२०२५ हे वर्ष म्हणजे स्वतंत्र भारताच्या पहिल्या ‘रुपया’ नाण्याचा ७५वा वाढदिवस. या संस्मरणीय घटनेनिमित्त ‘सरमाया प्रतिष्ठाना’तर्फे फोर्टमधल्या लॉरेन्स अँड मेयो इमारतीच्या दुसऱ्या मजल्यावर ‘ओडिसी ऑफ द रुपी’ या प्रदर्शनाचे आयोजन करण्यात आले आहे. प्रदर्शन ३ नोव्हेंबरपासून सुरू झाले असून ते ३१ जानेवारी २०२६पर्यंत १० ते ५ या वेळात जनतेसाठी खुले राहील.

स्वतंत्र भारताच्या संविधानिक सभेने तिचे कामकाज पूर्ण केल्यानंतर २६ जानेवारी १९५० रोजी प्रजासत्ताक भारताचा जन्म झाला. राष्ट्रीय चलन म्हणून या दिवशी भारतीय रुपयाची स्वीकृती झाली आणि ब्रिटिश सम्राटाच्या शीर्षाऐवजी भारताचे सार्वभौम चिन्ह म्हणून अशोक स्तंभाचे चित्र असलेली नाणी पाडण्यात यावीत, हा निर्णय घेण्यात आला. त्याबरहुकूम, १५ ऑगस्ट १९५० रोजी ही नाणी चलनात आली.

पण रुपयाचा इतिहास त्याहीआधी सुमारे पाचशे वर्षे मागे जातो. १५३८ साली अफगाण सुलतान शेर शहा सूरी याने शुद्ध चांदीच्या एक तोळा वजनाच्या नाण्याशी प्रत्येकी सुमारे २० ग्रॅम वजन असलेल्या ४० तांब्याच्या नाण्यांशी सांगड घालून एक सुसूत्र चलनपद्धती निर्माण केली. या चांदीच्या नाण्याचे नाव ‘रुपया’ होते, हे आपल्याला अकबराच्या नवरत्नांपैकी एक अबुल फझल याने लिहिलेल्या ‘ऐन-ए अकबरी’ या ग्रंथात समजते.

अफगाणांचा पराभव करून दृढमूल झालेल्या मुघल साम्राज्याच्या शासकांनी या रुपयाचा हार्दिक अंगिकार केला. कुशल व्यवस्थापन आणि कडक नियंत्रण ही मुघल चलनव्यवस्थेची व्यवच्छेदक लक्षणे. मुघल साम्राज्याच्या राजस्व आणि आय-व्यय पद्धतीमुळे रुपया भारतीय उपखंडात सर्वदूर पसरला. उत्तरेला काबूलपासून दक्षिणेत त्रिचनापल्लीपर्यंत आणि पश्चिमेच्या सिंधपासून पूर्वेच्या चितगांवपर्यंत मुघलांच्या शंभराहून अधिक टांकसाळी रुपयांची नाणी पाडत असत.

व्यापार-उदीमाच्या व्यवहारात अशा विश्वसनीय चलनाचे महत्त्व काय ते वेगळे सांगायला नको. रुपयाच्या याच महत्त्वामुळे व्यापारी म्हणून आलेल्या आणि पुढे राज्यकर्ते बनलेल्या ब्रिटिश ईस्ट इंडिया कंपनीसारख्या युरोपीय सत्तांनीही भारतात रुपयेच पाडले. सुदूर पूर्वेकडच्या व्यापारासाठी मुघल रुपयाच्या वापराला डच ईस्ट इंडिया कंपनीने अधिमान्यता दिली. त्यातून रुपयाच्या चलनाचा प्रसार सुमात्रा आणि जावा बेटांत झाला. आजही या भागातल्या इंडोनेशियाचे चलन ‘रुपिया’ याच नावाने ओळखले जाते.

अठराव्या शतकात मुघल साम्राज्याच्या विघटनाची प्रक्रिया सुरू झाली. मराठे, रजपूत, शीख यांच्यासारख्या प्रांतीय मूळ असलेल्या सत्ता तसेच विघटनाद्वारे निर्माण झालेल्या निजाम आणि नवाबी सत्ता या सर्वांनी आपापले रुपये निर्माण केले. इंग्रज, फ्रेंच, पोर्तुगीज अशा युरोपीय सत्तांच्या रुपयांची त्यात भर पडली. त्यामुळे १८-१९व्या शतकात भारतीय उपखंडात शेकडो वेगवेगळ्या रुपयांचे चलन निर्माण झाले. ही नाणी तत्वतः मुघल बादशहांच्या नावेच पाडली जात - पण त्यांच्यावर खरी अधिसत्ता कोणाची हे दर्शवायला चिन्हांचा वापर केला जाई. भौमितिक आकृत्या, फुले- पाने-प्राणी, आद्याक्षरे अशा विविध चिन्हांचा आढळ असणारे रुपये हे या काळातल्या भारतीय चलनाचे महत्त्वपूर्ण वैशिष्ट्य होते. या रुपयांची अदलाबदल आणि हुंडणावळीचे काम सराफ वर्ग करे. अर्थात सराफांच्या हाती मोठी आर्थिक ताकद एकवटलेली होती.

एकोणिसाव्या शतकात ब्रिटिश साम्राज्यसत्ता जसजशी बळकट होऊ लागली तसतसा या विविध रुपयांचा तिला जाच होऊ लागला. पण खुद्द ब्रिटिश ईस्ट इंडिया कंपनीसुद्धा चलनवैविध्याला अपवाद नव्हती. मुंबई मद्रास आणि बंगाल या तीन प्रांतातही वेगवेगळे रुपयेच प्रचलित होते. एतद्देशीय सत्ता मांडलिक बनल्यावरही सारा, खंडणी, नजराणा अशा बाबतींत त्यांचीच नाणी चालवून घ्यावी लागत किंवा ब्रिटिश रुपयांत









बदलून घ्यावी लागत. त्यांच्यात एकंदरीतच बजबजपुरी माजलेली असल्याने त्यांच्या रुपयांच्या शुद्धतेवरही त्यांचा ताबा राहिला नव्हता. सराफांचे व्याजबट्ट्याचे व्यवहारही या वैविध्यामुळे गुंतागुंतीचे झाले होते.

या सगळ्यातून मार्ग काढायचा तर एकसमान, सगळ्यांना मान्य असे विश्वासपात्र चलन निर्माण करायला हवे हे ब्रिटिशांनी जाणले. पण रुपयांची व्यवहारातली मागणी लक्षात घेता असे चलन एका रात्रीत वापरात आणणे शक्य नव्हते. त्यासाठी रुपयांचा पुरवठा वाढवायची नितांत गरज होती. औद्योगिक क्रांतीतून जन्माला आलेल्या वाफेच्या यंत्रांनी हे काम सुकर केले. जॉन हॉकिन्स या इंजिनियरच्या देखरेखीखाली मुंबईला यंत्रसज्ज टांकसाळ उभी राहिली. १८३५ साली 'एकसमान चलना'च्या कायदान्वये ब्रिटिशांनी त्यांच्या थेट आधिपत्याखालच्या सर्व प्रदेशांत एकाच 'रुपया'चे चलन सुरू केले. ब्रिटिश राजाचा छाप असलेला हा पहिलाच रुपया!

१८५७च्या स्वातंत्र्यसंग्रामानंतर कंपनीची सत्ता बरखास्त करून ब्रिटिश पार्लमेंटने भारताचा कारभार राणी व्हिक्टोरियाच्या नावे हाती घेतला. १८६२ साली राणीचे शीर्ष असणारा 'राणीछाप' रुपया जन्माला आला. त्यानंतर स्वातंत्र्यप्राप्तीपर्यंत वेगवेगळ्या ब्रिटिश सम्राटांची शीर्षे भारतीय रुपयांनी मिरवली. हे रुपये मुख्यत्वे मुंबई आणि कलकत्त्याच्या टांकसाळीत पाडले जात.

ब्रिटिशांनी एकसमान चलन जारी केले तरी कित्येक राजेरजवाडे आपापले रुपये पाडतच असत. ब्रिटिश साम्राज्यसत्तेला हे अर्थातच नको होते आणि संस्थानिकांच्या पायात खोडा घालण्याचे काम ब्रिटिशांनी शक्य तितक्या दबावतंत्राचा वापर करून जारी ठेवले. कित्येक लहानसहान संस्थाने या दबावाला बळी पडली आणि त्यांनी आपल्या टांकसाळी बंद केल्या. पण रुपया हे केवळ विनिमयाचे साधन नव्हते; तो राजांच्या अधिकारांचा आणि त्यांच्या तथाकथित 'सार्वभौमते'चाही द्योतक




होता. बडोदा आणि हैदराबादसारख्या मोठ्या संस्थानांनी तर ब्रिटिशांचाच मार्ग चोखाळत आपली नाणी यांत्रिक पद्धतीने पाडायला सुरुवात केली. पण १९व्या शतकाच्या उत्तरार्धात चांदीचा पुरवठा पुष्कळच वाढल्याने जी आर्थिक घसरण उद्भवली, त्यातून पुष्कळशा संस्थानिकांनी आपापले रुपये काढणं बंद केलं. अपवाद मुख्यतः हैदराबादचा!

१८६१ साली नवीन सरकारी खाते स्थापन करून कागदी रुपयांची निर्मिती वितरण आणि जारीकरण सुरू झाले. १९२५मध्ये नाशिकला प्रतिभूती मुद्रणालय सुरू होईपर्यंत भारतीय नोटा ब्रिटिश कंपन्या छापत. सुरुवातीच्या सरकारी नोटांवर




व्हिक्टोरियाचे छोटे चित्र छापले जाई. पण लवकरच केवळ लिखाण आणि वेगवेगळ्या लिपींत/ भाषांत मूल्यांकनाची सूचना, इतकाच आराखडा असलेल्या रुपयांच्या नोटा चलनात आल्या. १९१७मध्ये पहिल्या महायुद्धामुळे उद्भवलेल्या चलन-तुटवड्यावर मार्ग म्हणून सरकारने प्रथमच एक रुपयाची नोट काढली. या नोटांवर रुपयाच्या नाण्याचे चित्र होते, कारण या नोटा म्हणजे नाण्यांचेच 'एकास एक' असे प्रतिरूप होते. १९३५ साली रिझर्व्ह बँक ऑफ इंडियाची स्थापना झाल्यावर रुपयांच्या नोटा जारी करण्याचा अधिकार या संस्थेकडे सुपूर्द करण्यात आला.

रुपया हा व्यापारासाठी प्रमाणभूत आणि लोकप्रिय चलनांपैकी एक होता असे वर म्हटलेच. व्यापारी संबंधांद्वारे त्याचे चलन अरबी समुद्रापलिकडच्या आखाती देशांत, आजच्या येमेन आणि सौदी अरेबियात तसेच आफ्रिकेच्या पूर्व किनाऱ्यावरच्या देशांत फैलावले होते. तिथल्या युरोपियन वसाहतिक शासनांनी १९ व्या शतकात आपापले रुपये जारी केले- त्यात इटालियन, ब्रिटिश, जर्मन, पोर्तुगीज इत्यादी शासनांचा समावेश होता. खेरीज, भारतीय रुपये त्या प्रदेशांत नेले जाऊन प्रतिमुद्रित करून तिथे वापरले गेल्याचीही उदाहरणे आहेत. पण केवळ व्यापार हे रुपयाच्या प्रसाराचे मुख्य साधन नव्हते, युद्धे आणि शत्रुत्वातूनही त्याचा प्रसार झालेला दिसतो. इराणच्या नादीर शहाने १७३९ साली दिल्ली लुटली. त्या लुटीत त्याला इतके रुपये मिळाले की इराणला परतल्यावर त्याने रुपया हाच त्याच्या साम्राज्याचा आर्थिक पाया बनवला. असे इराणी रुपये पार जॉर्जियामधल्या तिफ्लिस (त्बिलिसी) शहरापर्यंत विस्तारलेल्या टांकसाळीत पाडले गेले! १९५९ साली रिझर्व्ह बँकेने केवळ आखाती देशांत चालवण्याच्या हेतूने खास नोटा जारी केल्या. या प्रयोगात सोन्याच्या तस्करीला आळा घालण्याचा हेतू होता. परंतु १९६६ साली आर्थिक परिस्थिती बिकट झाल्याने भारताला रुपयाचे अवमूल्यन करावे लागले आणि आखातातही तेलसमृद्धीचा दौर सुरू झाला. त्यामुळे एकएक करून या देशांनी रुपयाचा वापर बंद केला आणि स्वतःची राष्ट्रीय चलने सुरू केली. ओमान हा रुपया वापरणारा शेवटचा आखाती देश. तिथे १९७२पर्यंत भारतीय रुपया चालत असे.

रुपयाचा इतिहास हा अशा अनेक महत्त्वपूर्ण तपशिलांनी समृद्ध आणि म्हणूनच अतिशय मनोरंजक प्रकारे अभ्यासता येतो. राष्ट्रीय चलन म्हणून रुपया चलनवाढ, अवमूल्यन आणि 'नोटबंदी'सारख्या धक्क्यांतून गेला आहे. २०१० साली त्याला '₹' हे स्वतःचे चलनचिन्ह प्राप्त झाले आहे. एक वैश्विक आणि व्यापारी चलन म्हणून रुपयाचा इतिहास हा मानवी संस्कृती आणि संपर्काचे ताणेबाणे आकळायला निश्चित मदत करतो. आज रुपया 'डिजिटल' युगात प्रवेश करतो आहे. केंद्रीय बँकेचे डिजिटल चलन म्हणून त्याचा आंतरजालीय अवतार आविष्कृत झाला आहे. भारत लवकरच जगातल्या पाच सर्वोच्च आर्थिक महासत्तांमध्ये स्थान पटकावेल. अशा ऐतिहासिक उंबरठ्यावर उभ्या असलेल्या रुपयाला ७५व्या वाढदिवसाच्या शुभेच्छा!

**(लेखक ऑक्स्फर्ड विद्यापीठातील ॲशमोलियन संग्रहालयाचे वरिष्ठ वस्तुपाल आहेत.)**